# राष्ट्रीय जंतनाशक दिवस

# मार्गदर्शक सूचना

**प्रस्तावनाः-**

जागतिक आरोग्य संघटनेच्या अंदाजानुसार भारतात १ ते१९ वर्षे वयोगटातील किमान २४१ दशलक्ष (६८%) बालकांमध्ये आढळणारा आतडयांचा कृमीदोष हा मातीतून प्रसारित होणारे जंतामुळे होतो. जगात २८ टक्के बालकांना असा कृमीदोष होण्याची शक्यता असते.

याचे प्रमुख कारण म्हणजे वैयक्तिक व परिसर स्वच्छतेचा अभाव असणे हे आहे. या कृमीदोषांचा संसर्ग दुषित मातीच्या संपर्कात आल्यामुळे सहजतेने होतो. बालकांमध्ये होणारा दीर्घकालीन कृमीदोष हा व्यापक आणि मुलांना कमजोर करणारा आहे. कृमीदोष हा रक्तक्षय आणि कुपोषणाचे कारण तर आहेच तसेच बालकांची बौध्दिक व शारिरीक वाढ खुंटण्याचे कारण ठरते. भारतात ६ ते ५९ महिन्यांच्या वयोगटातील प्रत्येकी १० बालकामागे ७ बालकांमध्ये रक्तक्षय आढळतो व ग्रामीण भागामध्ये हे प्रमाण जास्तही असु शकते. तसेच १५ ते १९ वर्षे वयोगटातील ५६ टक्के किशोरवयीन मुलींमध्ये व ३० टक्के किशोरवयीन मुलांमध्ये रक्तक्षय आढळतो.

बालकांमध्ये होणारा दीर्घकालीन कृमीदोष हा व्यापक आणि मुलांना कमजोर करणारा आहे. कृमीदोष हा रक्तक्षय आणि कुपोषणाचे कारण तर आहेच तसेच बालकांची बौध्दिक व शारिरीक वाढ खुंटण्याचेही कारण ठरते. भारतात ६ ते ५९ महिन्यांच्या वयोगटातील प्रत्येकी १० बालकामागे ७ बालकांमध्ये रक्तक्षय आढळतो व ग्रामीण भागामध्ये हे प्रमाण जास्तही असु शकते. तसेच १५ ते १९ वर्षे वयोगटातील ५६ टक्के किशोरवयीन मुलींमध्ये व ३० टक्के किशोरवयीन मुलांमध्ये रक्तक्षय आढळतो. महाराष्ट्रात ५ वर्षाखालील कुपोषणामुळे वाढ खुंटलेल्या बालकांची टक्केवारी एन. एफ. एच. एस. ४ च्या सर्व्हेनुसार ३४.४ टक्के आहे. तसेच नुकताच नॅशनल सेंटर फॉर डिसीज कंट्रोल या एजन्सीने केलेल्या सर्व्हेनुसार मातीतून प्रसारित होणाऱ्या कृमीदोषाचे प्रमाण महाराष्ट्रात २७.५५ % आढळले आहे. त्याअनुषंगाने केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनूसार राज्यात राष्ट्रीय जंतनाशक दिन वर्षातुन दोनदा राबविण्यात येणार आहे.

**राष्ट्रीय जंतनाशक दिनाचा उद्देश-**

राष्ट्रीय जंतनाशक दिनाचा उद्देश हा १-१९ वर्षे वयोगटातील सर्व मुलां - मुलींना शाळा व अंगणवाडी केंद्र स्तरावर जंतनाशक गोळी देवून त्यांचे आरोग्य चांगले ठेवणे, पोषण स्थिती, शिक्षण व जीवनाचा दर्जा उंचावणे हा आहे.

**राष्ट्रीय जंतनाशक मोहिम अंमलबजावणी**

**अ ) मोहिमेची तारीख**

१) २ **सप्टेंबर २०१६ - राष्ट्रीय जंतनाशक दिन**

२) ७ **सप्टेंबर २०१६- मॉप अप दिन**

**ब) लाभार्थी :-**

- १ ते ५ वर्ष वयोगटातील सर्व बालके.
- १ ली ते १२ वीतील ( ६ ते १९ वर्ष वयोगटातील ) सर्व शाळेत जाणारे मुले - मुली.
- ६ ते १९ वयोगटातील शाळेत न जाणारे मुले - मुली.

**क) मोहिम राबविण्याचे जिल्हे व नगरपालिका :-**

**जंतनाशक मोहिम जिल्हे :-**

चंद्रपुर व गडचिरोली जिल्हे व चंद्रपुर मनपा वगळता सर्व जिल्हे व मनपा येथे राष्ट्रीय जंतनाशक दिन राबविण्यात यावा.

**ड) मोहिम राबविण्यासाठीच्या संस्था**

- शाळा :- सर्व शासकीय शाळा/शासकीय अनुदानित शाळा/आश्रमशाळा/महानगरपालिका व सर्व खाजगी अनुदानित शाळा
- अंगणवाडी :- सर्व ग्रामीण व शहरी अंगणवाडी व मिनी अंगणवाडी केंद्रे

**इ) राष्ट्रीय जंतनाशक मोहिमेची अंमलबजावणी करणारे विभाग**

१) सार्वजनिक आरोग्य विभाग

२) महिला व बाल विकास विभाग

३) शिक्षण विभाग

४) आदिवसी विभाग

**फ ) विभागांच्या जबाबदाऱ्या**

**सार्वजनिक आरोग्य विभागाच्या जबाबदाऱ्या खालीलप्रमाणे:-**

- राष्ट्रीय जंतनाशक दिन समन्वय समिती स्थापन करुन त्यांनी सर्व संबंधित विभागाच्या सभा घ्याव्यात.
- शिक्षण, बाल विकास व आदिवसी विकास विभागाकडून त्यांचे लाभार्थी निश्चित करुन विभागाच्या सहाय्याने ॲल्बेंडॅझोल गोळयांची खरेदी व वाटप करुन वितरण करणे. जंतनाशक गोळया सर्व शासकीय, शासकीय अनुदानित शाळा, आश्रम शाळ व खाजगी अनुदानित व अंगणवाडी केंद्राना पोहचतील याची खात्री करणे.
- सर्व शिक्षण, महिला बाल विकास विभाग व आदिवासी वि. वि यांच्या राज्यस्तरीय, जिल्हास्तरीय संबंधित अधिकारी व कर्मचारी यांना प्रशिक्षित प्रशिक्षकांच्या मार्फत प्रशिक्षण दयावे. तसेच सर्व आशा, आरोग्य परिचारिका, शालेय शिक्षक व अंगणवाडी कार्यकर्ती यांना कार्यक्रमाचे प्रशिक्षण दयावे.
- एखादी प्रतिकूल घटना घडल्यास त्याबाबतच्या व्यवस्थापकीय मार्गदर्शक सूचना हया राज्यस्तरापासून ते शाळा व अंगणवाडी केंद्र स्तरावर सर्वांना वितरीत कराव्यात.

- शालेय पटावर तसेच अंगणवाडी पटावर नसलेल्या लाभार्थ्यांना "जंतनाशक दिन" अथवा मॉप-अप दिन जंतनाशक गोळी देण्याकरीता सर्व शाळाबाहय किशोरवयीन मुले व मुली यांची यादी करुन त्यांना जंतनाशक गोळी देण्यास आशामार्फत अंगणवाडी केंद्रात आणावे.
- राष्ट्रीय जंतनाशक दिनाअंतर्गत झालेल्या कार्याचा अहवाल विहीत नमुना जिल्हास्तरावर छपाई करुन प्रत्येक शाळा व अंगणवाडी केंद्रास द्यावा.
- या कार्यक्रमाचे संनियंत्रण करुन झालेल्या कार्याचा अहवाल शिक्षण विभाग आणि महिला व बाल विकास विभागकडून विहित कालावधीत घ्यावा व या कार्यालयास सादर करावा.

**शिक्षण विभाग व आश्रम शाळा यांच्या जबाबदाऱ्या खालीलप्रमाणे:-**

- सार्वजनिक आरोग्य विभागासोबत समन्वय साधून राष्ट्रीय जंतनाशक दिन परिणामकारकरित्या यशस्वीपणे राबविला जाईल, असे नियोजन करणे.
- शालेय पटावर असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येप्रमाणे जंतनाशक गोळयांची मागणी करुन सर्व शाळांमध्ये उपलब्ध करुन घेणे.
- सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्याशी समन्वय साधून सर्व शिक्षकांना या कार्यक्रमाचे प्रशिक्षण करुन घ्यावे. तसेच जंतनाशक गोळयांमुळे होणाऱ्या संभाव्य विपरीत परिणामाबद्दल माहिती देवून, ते कसे हाताळावेत, या बद्दल माहिती द्यावी.
- सर्व शाळांपर्यंत आरोग्य विभागाकडून मिळालेले प्रसिध्दी साहित्य पोहचविणे व तसेच **शाळा** व्यवस्थापन समिती यांचेमार्फत जनजागृती करावी.
- शिक्षण विभागातील अधिकारी यांनी क्षेत्रभेटी देवून या कार्यक्रमाचे संनियंत्रण करावे.
- ठराविक वेळेत झालेल्या कार्याचा संकलित अहवाल हा विहीत अहवालामध्ये आरोग्य विभागास सादर करावा.

**महिला व बाल विकास विभागाच्या जबाबदाऱ्या -**

- सार्वजनिक आरोग्य विभागाशी समन्वय साधून राष्ट्रीय जंतनाशक दिन परिणामकारक व यशस्वीपणे राबविला जाईल, असे पहावे.
- १ ते १९ वर्ष वयोगटातील शाळेत न जाणारी मुले व मुली सर्व लाभार्थ्यांची नोंद करुन त्यांचेसाठी लागणाऱ्या गोळयांची मागणी आरोग्य विभागाकडे करावी.
- अंगणवाडी कार्यकर्ती व मदतनीस यांनी अंगणवाडी केंद्रात येणाऱ्या व न येणाऱ्या १ ते ६ वर्ष वयोगटातील बालके व ६ ते १९ वर्ष वयोगटातील शाळेत न जाणारे बालके व किशोरवयीन मुले व मुली यांना राष्ट्रीय जंतनाशक दिनी जंतनाशक गोळी द्यावी.

- मासिक सभेमध्ये अंगणवाडी पर्यवेक्षिका व अंगणवाडी कार्यकर्ती यांना जंतनाशक गोळी लाभार्थ्यांना देण्याबाबतचे प्रशिक्षण द्यावेत. तसेच संभाव्य विपरीत परिणाम होऊ शकतात याबाबत माहिती देवून, ते कसे हाताळावेत, याची माहिती द्यावी.
- प्रसिध्दी साहित्य सर्व अंगणवाडी केंद्रापर्यंत पोहचवावे.
- बाल विकास प्रकल्प अधिकारी व पर्यवेक्षिका यांनी क्षेत्रिय भेटी देवून या कार्यक्रमाचे संनियंत्रण करावे.
- **राष्ट्रीय जंतनाशक दिन अंतर्गत** झालेल्या कार्याचा संकलित अहवाल हा विहीत नमुन्यातील अहवालामध्ये आरोग्य विभागास सादर करावा.

**मोहिम राबविण्यासाठी समन्वय बैठक :-**

राष्ट्रीय जंतनाशक दिन मोहिम यशस्वीपणे राबविणेसाठी दि. २५ ऑगस्ट २०१६ पर्यंत जिल्हा पातळीवर जिल्हाधिकारी यांनी जिल्हा समन्वय समिती यांची बैठक आयोजित करुन सूचना निर्गमित कराव्या.

**औषधी व्यवस्थापन:-**

कार्यक्रमासाठी लागणाऱ्या जंतनाशक गोळंयाची (**Tab. Albendazole 400 mg**) अंदाजीत मागणी खालील प्रमाणे करावी.

१) अंगणवाडी क्षेत्रासाठी :-

| औषधी | वयोगट | मात्रा |
|---|---|---|
| जंतनाशक दिनाच्या मोहिमेसाठी लागणाऱ्या एकूण जंतनाशक गोळया | = | (१/२ × १ ते २ वयोगटातील बालके )+ १ गोळी × २ ते ६ वर्षे वयोगटातील सर्व बालके (अंगणवाडी केंद्रात नोंद असलेले किंवा नसलेले ) + (१ गोळी×६ ते १९ वयोगटातील शाळेत न जाणाऱ्या व अंगणवाडी केंद्रात नोंदणी नसलेल्या लाभार्थ्यांसाठी)+ १० टक्के जादाचा साठा |

२) **<u>शाळांसाठी व आश्रमशाळासाठी</u>**

| औषधी | वयोगट | मात्रा |
|---|---|---|
| जंतनाशक दिनाच्या मोहिमेसाठी लागणाऱ्या एकूण जंतनाशक गोळया | = | १ गोळी ×१ ली ते १२ वी मध्ये शिकणारे सर्व मुले व मुली + १० टक्के जादाचा साठा |

३) <u>जिल्हयासाठी एकूण</u>

| औषधी | वयोगट | मात्रा |
|---|---|---|
| जंतनाशक दिनाच्या मोहिमेसाठी लागणाऱ्या एकूण जंतनाशक गोळया | = | जिल्हयांतील एकूण अंगणवाडी साठी लागणारा साठा + जिल्हयांतील एकूण शासकीय, शासकीय अनुदानित , आश्रम शाळा, म्युन्सिपल शाळा व खाजगी अनुदानित शाळा यांसाठी लागणारा साठा + १० टक्के जादाचा साठा |

**औषधाची मात्रा**

| औषध | वयोगट | औषधीची मात्रा |
|---|---|---|
| Tablet Albendazole 400 MG | १ - २ वर्ष | अर्धी गोळी (अल्बेंडाझोल ४०० मि. ग्रॅ. गोळीची अर्धी गोळी ) (पावडर करुन व पाण्यात विरघळून द्यावे. ) |
| | २ - ३ वर्ष | एक गोळी (४०० मि. ग्रॅ. ) (पावडर करुन व पाण्यात विरघळून द्यावे. ) |
| | ३ - ६ वर्ष | एक गोळी ४०० मि. ग्रॅ. चाऊन खाण्यास किंवा पावडर करुन पाण्यात विरघळून द्यावे |
| | ६ - १९ वर्ष | एक गोळी ४०० मि. ग्रॅ. चाऊन खाण्यास द्यावी. |

**ज)** प्रशिक्षण :- प्रशिक्षण हे दोन स्तरांवर द्यावे.

१. जिल्हा स्तरावर :-

- जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकिय अधिकारी प्रा.आ.केंद्र, बाल विकास प्रकल्प अधिकारी (ICDS) , तालुका शिक्षण अधिकारी यांना प्रशिक्षण द्यावे.
- जिल्हा शल्य चिकित्सक यांनी सर्व उपजिल्हा ग्रामीण रुग्णालय व ग्रामीण रुग्णालय यांच्या वैद्यकीय अधिक्षकांना, महानगरपालिका आरोग्य अधिकारी , महानगरपालिका अंतर्गत येणाऱ्या हेल्थ पोस्टच्या आरोग्य अधिकारी तसेच शहरी बालविकास प्रकल्प अधिकारी ( Urban ICDS ) व शिक्षण अधिकारी यांना प्रशिक्षण द्यावे.

२. प्राथमिक आरोग्य केंद्र / हेल्थ पोस्ट / ग्रामीण रुग्णालय / उपजिल्हा रुग्णालय स्तरावर :-

- प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांच्या अंतर्गत येणाऱ्या सर्व ए. एन. एम. , एम. पी. डब्ल्यू, एच. ए. , आशा , अंगणवाडी कार्यकर्ती व शाळेच्या नोडल शिक्षकांना राष्ट्रीय जंतनाशक दिन मोहिमेचे प्रशिक्षण द्यावे.
- उपजिल्हा रुग्णालय व ग्रामीण रुग्णालय स्तरावर वैद्यकीय अधिक्षकांनी त्यांच्या अंतर्गत येणाऱ्या सर्व नगरपालिका ए.एन.एम. / एम. पी. डब्ल्यू यांना राष्ट्रीय जंतनाशक दिन मोहिमेचे प्रशिक्षण द्यावे.
- महानगरपालिकेतील हेल्थ पोस्ट स्तरावर वैद्यकीय अधिकारी यांनी त्यांच्या अंतर्गत येणाऱ्या सर्व ए. एन. एम. , अंगणवाडी कार्यकर्त्या व म्युन्सिपल व खाजगी शाळांच्या नोडल शिक्षकांना प्रशिक्षण द्यावे.

जिल्हा स्तरावरचे प्रशिक्षण दि. २० ऑगस्ट २०१६ पर्यंत पुर्ण करावे व प्राथमिक आरोग्य केंद्र / हेल्थ पोस्ट / ग्रामीण रुग्णालय / उपजिल्हा रुग्णालय स्तरावरचे प्रशिक्षण दि. २७ ऑगस्ट २०१६ पर्यंत पुर्ण करावे. हे प्रशिक्षण आयोजित करण्यासाठीचे अनुदानाच्या मार्गदर्शक सुचना सोबत जोडल्या आहे.

- शिक्षक व अंगणवाडी कार्यकर्ती यांच्या प्रशिक्षणाच्या वेळी त्यांना प्रशिक्षण साहित्य ( राष्ट्रीय जंतनाशक दिन मोहिमेची माहिती , एफ. ए. क्यूज , अहवाल नमूना, प्रतिकूल घटना घडल्यास अहवाल नमूना, राष्ट्रीय जंतनाशक दिनाचे प्रसिध्दी साहित्य (बॅनर, पोस्टर्स इ.) व लाभार्थी संख्ये प्रमाणे लागणारे जंतनाशक (अल्बेंडाझोल ४०० मी. ग्रा. ) गोळयांचा साठा ) याचे वाटप करावे.

- महिला व बाल विकास विभागाच्या अंतर्गत सर्व पर्यवेक्षिकेचे प्रशिक्षण हे बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी त्यांच्या नियमित मासिक सभेत घ्यावे.

- तालुका शिक्षण अधिकारी यांनी त्यांच्या अंतर्गत येणाऱ्या सर्व शासकीय, शासकीय अनुदानित व खाजगी अनुदानित शाळांच्या मुख्यापकांचे प्रशिक्षण हे त्यांच्या मासिक सभेत घ्यावे.

**झ) जनजागृती व जनसंपर्क :-**

राष्ट्रीय जंतनाशक दिनाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी जनजागृती आवश्यक आहे. या राष्ट्रीय जंतनाशक दिन मोहिमेसाठी खालीलप्रकारे जनजागृती करण्यात यावी.

- महत्वाचे संदेश हे साध्या, सोप्या व स्थानिक भाषेत असावेत. जनजागृतीचे संदेश हे पालकांना जागरुक करुन आपल्या पाल्यास जंतनाशक दिनी जंतनाशक गोळी घेण्यास प्रवृत्त करतील, असे असावेत.

- काही कारणास्तव ज्या बालकांस राष्ट्रीय जंतनाशक दिनी (२ सप्टेंबर २०१६) जंतनाशक गोळी दिली गेली नसेल, अशा उर्वरित बालकांना ०७ सप्टेंबर २०१६ रोजी मॉप-अप दिनी ही गोळी देण्यात येईल, अशी जनजागृती करण्यात यावी.

- जनजागृतीसाठी दैनिक वृत्तपत्रामध्ये आवाहन, स्थानिक रेडिओ व केबल चॅनलव्दारे जनजागृती, भिंतीवर म्हणी तसेच सामाजिक वार्तालापाव्दारे या मोहिमेची माहिती लोकांपर्यंत पोहोचवावी.

- ग्रामपंचायत, ग्राम आरोग्य स्वच्छता व पोषण समिती व शाळा व्यवस्थापन समिती यांच्या सभासदांना अंगणवाडी कार्यकर्ती व आशा यांच्या मदतीने एकत्र आणून त्यांना जंतनाशकाचे महत्व पटवून द्यावे व जास्तीत जास्त बालकांना याचा लाभ देण्यात यावा.

- मोहीमेअंतर्गत सर्व शाळा व अंगणवाडी केंद्राना राष्ट्रीय जंतनाशक दिनाचे प्रसिध्दी साहित्य (बॅनर, पोस्टर्स इ.) पोहचवावेत.

- राष्ट्रीय जंतनाशक दिनाच्या एक दिवस अगोदर अंगणवाडी व शाळांमधून प्रभात फेरीद्वारे जनजागरण करण्यात यावे.

- RCH Portal चा वापर करुन या कार्यक्रमाचे संदेश मॉप-अप राऊंड होई पर्यंत देत रहावेत. दि. २९ ऑगस्ट २०१६ पासून दररोज याबाबतचे संदेश RCH Portal मधून जनतेला देण्यात यावेत.
- कार्यक्रम राबविताना येणाऱ्या अडचणींचे समाधान करण्यासाठी राज्य आरोग्य विभागाची हेल्हपार्लन क्र.१०४ चा वापर करावा.
- गाव पातळीवर आशांनी सर्व पालकांची सभा घेऊन मुलांमध्ये कृमी दोषांचे परिणाम, जंतनाशनाचे फायदे व कृमी संसर्ग न होण्यासाठी दैनंदिन जीवनशैलीमध्ये बदल करण्याबद्दलचे मार्गर्शन करावे.

**राष्ट्रीय जंतनाशक दिनी करावयाची कार्यवाही -**

- लाभार्थींची अद्यावत यादी अंगणावाडी केंद्र स्तरावर उपलब्ध असावी.
- सर्व अंगणवाडी केंद्रावर १ ते ५ वर्ष वयोगटातील सर्व बालकांना जंतनाशक औषधी देण्यात यावी. तसेच ६ ते १९ वर्ष वयोगटातील शाळेत न जाणाऱ्या मुला - मुलींना जंतनाशक औषध देण्यात यावी.
- सर्व शासकीय , शासकीय अनुदानीत, आश्रम शाळा , म्युन्सिपल शाळा व खाजगी अनुदानित शाळांमधून १ ली ते १२ वीच्या सर्व विद्यार्थ्यांना जंतनाशक गोळी देण्यात यावी.
- आशा कार्यकर्तीनी १ ते ५ वर्षातील बालकांना व ६ ते १९ वर्ष वयोगटातील शाळेत न जाणाऱ्या मुला - मुलींना अंगणवाडी केंद्रावर येण्यास प्रवृत्त करावे.
- सर्व आरोग्य सेवक / सेविका , आरोग्य सहाय्यक यांनी प्रत्येक शाळा व अंगणवाडी केंद्रास भेट देऊन त्यांना सहाय्य करावे.

**महत्वाचे -**

- **१ वर्षाखालील लाभार्थ्यांना अल्बेंडाझॉलचे औषध देण्यात येऊ नये.**
- १ ते २ वर्षे वयोगटातील मुलांसाठी अल्बेंडाझॉलची गोळीची अर्धी गोळी (२०० मि.ग्रॅ.) देण्यात यावी . हया गोळीची पावडर करुन पाण्यात विरघळूनच मुलांना दयावी.
- २ ते ३ वर्षे वयोगटातील मुलांसाठी अल्बेंडोझॉल (४०० मि.ग्रॅ.) ची एक गोळी दयावी. हया गोळीची पावडर करुन पाण्यात विरघळूनच मुलांना दयावी.
- ३ ते ६ वर्षे वयोगटातील मुलांसाठी अल्बेंडाझॉल (४०० मि.ग्रॅ) ची एक गोळी दयावी. ही गोळी मुलास दातानी चावून खाण्यास सांगावी किंवा गोळी चावून खाता येत नसल्यास गोळीची पावडर करुन पाण्यात विरघळून दयावी. याबाबत कोणतीही तडजोड करु नये व काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.
- ६ ते १९ वर्ष वयोगटातील मुला - मुलींनी गोळी चावून खाण्यास द्यावी.
- गोळी दिल्यानंतर सर्व बालकांना स्वच्छ पिण्याचे पाणी पिण्यास द्यावे.
- या साठी प्रत्येक सत्राच्या ठिकाणी स्वच्छ पाणी उपलब्ध असावे.
- जंतनाशक औषधी दिलेल्या सर्व लाभार्थ्यांची नावे नोंदवही मध्ये नमूद करावी.
- **मोहिम सुरु असताना विविध वयोगटातील लाभार्थ्यांना देण्यात येणाऱ्या अल्बेंडाझॉल गोळया या लाभार्थ्यांच्या नातेवाईकाच्या हातात देण्यात येऊ नयेत किंवा लाभार्थ्यांच्या नातेवाईकास घरी घेऊन जाण्यासाठी देऊ नयेत.**
- **एखाद्या बालकास जंतनाशक औषधाची मात्रा दिल्यानंतर उल्टी/वांती झाल्यास पुनःश्च डोस देण्यात येवू नये.**
- आजारी असणाऱ्या मुला - मुलींना जंतनाशकदिनी / मॉप-अपदिनी ॲल्बेंन्डॅझोल ची गोळी (जंतनाशक गोळी) देवू नये. तथापि त्यांना ते पूर्णतः बरे झाल्यानंतर जंतनाशक गोळी वैद्यकिय अधिकारी यांच्या सल्ल्याने द्यावी.

- जंतनाशक गोळी दिल्यानंतर लाभार्थ्यास / विद्यार्थ्यास दोन तास अंगणवाडीत / शाळेत थांबण्यास सांगावे, जेणेकरुन काही संभाव्य विपरीत परिणाम झाल्यास ताबडतोब काळजी घेणे सुलभ होईल. ज्या मुला - मुलींना दि. ०२ सप्टेंबर २०१६ रोजी जंतनाशक गोळी दिली नसेल त्यांना दि.०७ सप्टेंबर २०१६ रोजीच्या मॉप-अप दिनी गोळी द्यावी.
- शाळा व अंगणवाडी केंद्रांनी त्यांचेकडे असलेला उर्वरित जंतनाशक गोळयांचा साठा आरोग्य सेवक/सेविका यांना मॉप-अप दिना नंतर परत करावा.
- **सर्व शाळा व अंगणवाडी केंद्रावर Emergency Helpline No. व तेथील प्राथमिक आरोग्य केंद्र येथील आरोग्य सेवक/सेविका, वैद्यकिय अधिकारी यांचे दुरध्वनी संपर्क क्रमांक दर्शनीभागात असावेत.**
- **जंतनाशक गोळी दिल्यानंतर काही विपरीत परिणाम झाल्यास (मळमळ/उलटी/पोटदुखी / अतिसार) त्वरीत टोल फ्री क्र.१०४ वर संपर्क साधावा व आवश्यकतेनुसार १०८ चा वापर संदर्भ सेवेसाठी करावा आणि दिलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार कार्यवाही करावी.तसेच आरोग्य सेवक/सेविका, वैद्यकिय अधिकारी यांनाही कळवावे.**

**ह ) जंतनाशक दिनाबाबतचे पर्यवेक्षण व सनियंत्रण :-**

१) राज्य व जिल्हा स्तरावर राष्ट्रीय जंतनाशक दिनासाठी सनियंत्रण पथके स्थापन करावीत व त्यांनी जंतनाशक दिनाच्या दिवशी ( २ सप्टेंबर २०१६) व मॉप-अप दिनाच्या दिवशी ( ०७ सप्टेंबर २०१६) शाळा व अंगणवाडी केंद्राना भेटी दयाव्यात.

२) जिल्हा व तालुकास्तरावरील पर्यवेक्षकांनी पर्यवेक्षण व सनियंत्रणासाठी दिलेल्या विहित प्रपत्राप्रमाणे उपयोग करुन पर्यवेक्षण करावे.

३) प्रत्येक जिल्हयाने या कार्यक्रमासाठी जिल्हा नोडल अधिकारी नेमावा व त्यांनी पर्यवेक्षण व संनियंत्रणासाठी शिक्षण व महिला बाल विकास विभागांशी समन्वय साधवा.

४) जिल्हा व तालुकास्तरावरील पर्यवेक्षकांनी पर्यवेक्षण व संनियंत्रणासाठी वापरलेले विहित प्रपत्र हे आरोग्य विभागाच्या जिल्हा नोडल अधिकारी यांचेकडे सादर करावेत.

**जंतनाशक दिनाच्या नोंदी व अहवाल सादरीकरण :-**

अ) शाळांकरिता - वर्गामध्ये ज्या विद्यार्थ्यांना जंतनाशक गोळी दिली अशा विद्यार्थ्यांची नोंद वर्ग शिक्षकाने खालील प्रमाणे ठेवावी.

- जंतनाशक गोळी दिलेल्या विद्यार्थ्यांच्या नावा शेजारी (✓) अशी खूण करावी.
- ज्या विद्यार्थ्यांना जंतनाशक दिनी गोळी दिली नसेल, अशा सर्व विद्यार्थ्यांची यादी तयार करावी.
- अशा वंचित राहिलेल्या विद्यार्थ्यांना मॉप-अप दिनी दि. ०७ सप्टेंबर २०१६ गोळया देऊन त्यांच्या नावापुढे दोन मार्क (✓ ✓) करावेत.

- मॉप-अप दिनाच्या शवेटी दोन टिकमार्क असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या मोजून त्याबाबतचा अहवाल मुख्याध्यापकांना सादर करावा.
- मुख्याध्यापकांनी दोन्ही दिवसांचा शाळेचा एकत्रित अहवाल २० सप्टेंबर २०१६ पर्यंत संबंधीत आरोग्य सेवक/सेविका, वैद्यकिय अधिकारी यांचेकडे सादर करावा.
- राष्ट्रीय जंतनाशक दिन राबवित असणाऱ्या जिल्हयांच्या सर्व नगर पालिका क्षेत्रातील शाळांनी त्यांचा अहवाल संबंधीत तालुका आरोग्य अधिकारी यांच्याकडे सादर करावा.

**ब) अंगणवाडी केंद्राकरिता :-**

अंगणवाडी कार्यकर्ती या १ ते ६ वर्षाच्या सर्व व शाळाबाहय ६ ते १९ वर्षे वयोगटातील शाळेत न जाणाऱ्या मुला - मुलींसाठी पुढील प्रमाणे नोंदी ठेवतील.

- ज्या बालकांना जंतनाशकदिनी जंतनाशक गोळी दिली अशा बालकांच्या नावापुढे एक टिक मार्क (✓ ) करावी.
- राष्ट्रीय जंतनाशक दिनाच्या दिवशी जंतनाशक गोळी न मिळालेल्या लाभार्थ्यांची यादी तयार करुन आशा कार्यकर्तीला दयावी. आशा कार्यकर्तीने अशा सर्व लाभार्थ्यांच्या घरी भेटी देवून त्यांना मॉप-अप दिनी जंतनाशक गोळी घेण्यास प्रवृत्त करावे.
- ज्या लाभार्थ्यांना मॉप-अप दिनी जंतनाशकची गोळी देण्यात येईल त्यांच्या नावापुढे दोन टिक मार्क (✓ ✓) करण्यात यावेत. व अशा सर्व एकत्रित लाभार्थ्यांचा अहवाल तयार करावा व २० सप्टेंबर २०१६ पर्यंत हा एकत्रित अहवाल आरोग्य सेवक/सेविका यांचेकडे सादर करावा.

## जंतनाशक मोहिमे दरम्यान काही गुंतागुंतीचे प्रसंग झाल्यास करावयाची कार्यवाही

अल्बेंडाझोलची गोळी ही लहान मुलांसाठी तसेच मोठयांसाठी सुरक्षित जंतनाशकाची गोळी आहे.

जंतनाशक औषधीमुळे होणारे दुष्परिणाम फारच थोडे आहेत त्यात सौम्य प्रमाणात चक्कर येणे, मळमळणे, उलटी होणे किंवा डोके दुखी, पोटदुखी व थकवा यांचा समावेश आहे हे सर्व लाभार्थीच्या शरीरात जंतसंसर्गामुळे व त्यावर होणाऱ्या औषधाच्या परिणामामुळे होतो. हे सर्व दुष्परिणाम थोडयाच वेळात नाहीशे होतात. हे दुष्परिणाम तात्पुरते असून शाळा व अंगणवाडी केंद्रावर सहजगत्या हाताळण्यासारखे आहेत.

**सौम्य प्रकारच्या दुष्परिणामांकरिता :-**

- असे काही झाल्यास ताबडतोब हेल्प लाईन नंबर १०४ यांना संपर्क साधावा.
- लाभार्थ्याला सावलीत विश्रांती करण्यास घेऊन जावे व स्वच्छ पाणी पिण्यास द्यावे.
- या लाभार्थ्याला किमान दोन तास देखरेखी खाली ठेवावे.
- जर प्रतिक्रीया गंभीर स्वरुपाची असेल तर हे जंतनाशक औषधीशी निगडीत नसून इतर काही कारणांमुळे सुध्दा असू शकते.
- अशा वेळी ताबडतोब नजीकच्या आरोग्य संस्थेला लाभार्थ्याला घेऊन जावे.

- शिक्षक व अंगणवाडी कार्यकर्ती यांना याबाबतचे प्रशिक्षण राष्ट्रीय जंतनाशक दिनाच्या प्रशिक्षणाच्या वेळी देण्यात यावी.

**मुख्याध्यापक, शिक्षक व अंगणवाडी कार्यकर्त्यांसाठी :-**

- जंतनाशकाच्या गोळीमुळे होणाऱ्या गुंतागुंतीच्या प्रसंगासाठी तयार असावे.
- वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र / ग्रामीण रुग्णालय / हेल्थ पोस्ट, आरोग्य सेविका / सेवक यांचे तात्कालीन संपर्क नंबर शाळेत व अंगणवाडी केंद्रावर दर्शनीय भागात प्रदर्शित करुन ठेवावे.
- राष्ट्रीय जंतनाशक दिनी व मॉप अप दिनी शिक्षकांनी व अंगणवाडी कार्यकर्तीनी अल्बेंडाझोलची गोळी स्वतः देखरेखीखाली द्यावी.

**वैद्यकीय अधिकाऱ्यांसाठी :-**

- ॲडव्हर्स इव्हेंट मॅनेजमेंटच्या प्रोटोकॉल प्रमाणे वैद्यकीय अधिकारी यांनी सर्व महत्वाचे औषधी आरोग्य केंद्रात उपलब्ध असल्याची खात्री करावी.
- गुंतागुंतीच्या प्रसंगाच्या वेळी तातडीने सेवा उपलब्ध करुन देण्यास आरोग्याची टीम तयार करावी.

**तीव्र स्वरुपाच्या गुंतागुंतीच्या प्रसंगासाठी :-**

- दुष्परिणाम बाधित लाभार्थ्याला इतरांपासून वेगळे करावे व जंतनाशक मोहिम थांबवावी.
- संयम बाळगून ही प्रतिक्रीया बहुदा तीव्र जंतबाधेमुळे झाली असल्याची शक्यता आहे असे सांगावे.
- शाळेच्या मुख्याध्यापकानी झालेल्या घटनेबद्दलची संपूर्ण माहिती त्वरित आरोग्य सेविका / सेवक / वैद्यकीय अधिकारी , प्राथमिक आरोग्य केंद्र / हेल्थ पोस्ट यांना द्यावी.
- रुग्णवाहिका उपलब्ध असल्यास ताबडतोब लाभार्थ्यास नजीकच्या प्राथमिक आरोग्य केंद्रास किंवा ग्रामीण रुग्णालयास संदर्भीत करावे.
- लाभार्थ्यांच्या पालकांना त्वरित सूचित करावे.
- आरोग्य सेविकेने या आजारी लाभार्थ्याबरोबर जावे व त्यांना तात्काळ उपचार उपलब्ध होईल याची दक्षता घ्यावी.
- आरोग्य सेविकेने तात्काळ वैद्यकीय अधिकारी यांना झालेल्या घटनेबद्दल अवगत करावे व वैद्यकीय अधिकारी यांनी घटनेचा अहवाल तयार करुन जिल्हा आरोग्य अधिकारी / वैद्यकीय अधिकारी महानगर पालिका / जिल्हा शल्य चिकित्सक यांना त्याच दिवशी सादर करावा.

**प्रसार माध्यमांना हाताळणे :-**

- प्रसार माध्यमांशी बोलायला एक प्रवक्ता निश्चित करावा.
- प्रवक्त्याने शांत पणे व संयमाने झालेल्या घटनेची माहिती द्यावी व ही घटना जंतनाशक गोळया मुळे झाली नसावी याबद्दल शाश्वती द्यावी.
- प्रसारमाध्यमांशी चर्चेपुर्वी जंतनाशक मोहिमेची मुख्य संदेश , उद्दीष्ट तयार करावे. तसेच काही महत्वाच्या प्रश्नांसाठी उत्तरे तयार करावीत.
- मुख्य संदेश हे जंतनाशकाचे फायदे व मुलांच्या सुरक्षिततेसाठी महत्वाचे आहे यावर केंद्रीत असावेत.
- तीव्र स्वरुपाचे दुष्परिणाम झाल्यास तात्काळ कसून तपास करावा.

**तीव्र स्वरुपाचे दुष्परिणाम होऊ नये यासाठी शाळा व अंगणवाडी यांनी काय करावे व काय करुन नये :-**

**काय करावे :-**

- नजीकच्या आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांचे तसेच आरोग्य सेवक / सेविकांचे फोन नंबर (भ्रमण ध्वनी क्रमांक ) हाताशी ठेवावा.
- मुलांना नेहमी गोळी चावून खाण्यास सांगावी.
- स्वत:च्या देखरेखीखाली गोळी खाण्यास द्यावी.
- ज्या मुलांना गोळी चावून खाता येत नाही अशांना गोळीची पावडर / चुर्ण करुन नंतर पाण्यात विरघळून द्यावी.

**काय करु नये :-**

- आजारी बालकांना जंतनाशकाची गोळी देऊ नये.
- जंतनाशकाची गोळी तशीच गिळण्यास सांगू नये.
- जंतनाशकाची गोळी घरी खाण्यासाठी पालकांच्या हातात देऊ नये.

**<u>बालकाच्या घशात गोळी अडकून श्वास गुदमरल्यास तातडीने काय करावे.</u>**

१) **लहान बालकांमध्ये :-**


अ) लहान बालकास आपल्या मांडीवर पालथे झोपवून (बालकाची छाती मांडीवर येईल असे)

बालकाचे डोके तुमच्या मांडीच्या खालच्यास्तरावर असावे. तुमच्या तळहाताने बालकाच्या पाठीच्या मध्यभागी ५ ते ६ वेळा थोपटावे, जेणेकरुन गोळी घश्याबाहेर सरकेल.

ब) हे यशस्वी न झाल्यास बालकाला मांडीवर उताणे (पाठीवर) झोपवून तूमच्या दोन बोटांनी

बालकाची छाती दाबावी, असे ५ ते ६ वेळा करावे.

क) वरील उपाय करुनही गोळी न निघाल्यास बालकास ताबडतोब आरोग्य केंद्रास संदर्भित करावे.



२) **मोठया बालाकांसाठी :-**


अ) बालकास आपल्या मांडीवर पालथे झोपवून (बालकाचे पोट मांडीवर येईल असे)

वालकाचे डोके तुमच्या मांडीच्या खालच्यास्तरावर असावे. तुमच्या तळहाताने बालकाच्या

पाठीच्या मध्यभागी ५ ते ६ वेळा थोपटावे, जेणेकरुन गोळी घश्याबाहेर सरकेल.

ब) हे यशस्वी न झाल्यास बालकाला उभे करुन पाठीमागून बालकाच्या छातीच्या पिंजऱ्याखाली धरावे व बालकाचे शरीर वर जाण्यासारखे दाबावे.

क) वरील उपाय करुनही गोळी न निघाल्यास बालकास ताबडतोब आरोग्य केंद्रास संदर्भित करावे.



वरील प्रमाणे मागणी केल्यावर त्यानुसार प्रत्येक जिल्हयातील प्राथमिक आरोग्य केंद्राला गोळयांचा साठा उपलब्ध झाल्यावर सर्व शाळा व अंगणवाडी केंद्रातील शिक्षक व अंगणवाडी सेविका यांना त्यांच्या प्रशिक्षणाच्या वेळी राष्ट्रीय जंतनाशक मोहिम कीट (माहिती व प्रसार साधने व लाभार्थी संख्येनुसार गोळया , अहवाल नमुने इ. ) देण्यात यावे.

वरील प्रमाणे मागणी केल्यावर त्यानुसार प्रत्येक जिल्हयातील प्राथमिक आरोग्य केंद्राला गोळयांचा साठा उपलब्ध झाल्यावर सर्व शाळा व अंगणवाडी केंद्रातील शिक्षक व अंगणवाडी सेविका यांना त्यांच्या प्रशिक्षणाच्या वेळी राष्ट्रीय जंतनाशक मोहिम कीट (माहिती व प्रसार साधने व लाभार्थी संख्येनुसार गोळया , अहवाल नमुने इ. ) देण्यात यावे.

**अहवाल सादरीकरण**

**प्रत्येक पातळीवर जंतनाशक दिनाचा अहवाल सादर करण्याबाबतची सविस्तर माहिती खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे करण्यात यावी.**

| | पातळी | अहवाल सादर करण्यास जबाबदार व्यक्ति | कोणास सादर करावयाचे | अहवाल नमुना | अहवाल सादरीकरणाची तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १ | शाळा | मुख्याध्यापक | संबंधित आरोग्य सेविका/आरोग्य सेवक | शाळेचे अहवाल प्रपत्र | २० सप्टेंबर २०१६ |
| २ | अंगणवाडी केंद्र | अंगणवाडी कार्यकर्ती/अंगणवाडी पर्यवेक्षिका | संबंधित आरोग्य कर्मचारी | अंगणवाडी अहवाल प्रपत्र | |
| ३ | अंगणवाडी केंद्र | आशा कार्यकर्ती/लिंक वर्कर | संबंधित आरोग्य कर्मचारी | आशा – अहवाल प्रपत्र | |
| ४ | उपकेंद्र स्तर | आरोग्य | प्रा.आ. वैद्यकिय | उपकेंद्र एकत्रित | २६ सप्टेंबर |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | सेवक/सेविका | अधिकारी | अहवाल प्रपत्र | २०१६ |
| ५ | प्राथमिक आरोग्य केंद्र स्तर | वैद्यकिय अधिकारी | तालुका वैद्यकिय अधिकारी | प्रा.आ.केंद्र /ग्रा. रु. अहवाल प्रपत्र | २८ सप्टेंबर २०१६ |
| ६ | तालुका स्तर | तालुका वैद्यकिय अधिकारी | जिल्हा संनियंत्रण अधिकारी | तालुका अहवाल प्रपत्र | ३० सप्टेंबर २०१६ |
| ७ | उपजिल्हा रुग्णालय / ग्रामीण रुग्णालय | वैद्यकीय अधिक्षक | जिल्हा शल्य चिकित्सक | प्रा.आ.केंद्र /ग्रा. रु. अहवाल प्रपत्र | २८ सप्टेंबर २०१६ |
| ८ | जिल्हा शल्य चिकित्सक | निवासी वैद्यकीय अधिकारी (बाहयसंपर्क) | जिल्हा संनियत्रण अधिकारी | जिल्हा अहवाल प्रपत्र | ०५ ऑक्टोबर २०१६ |
| ९ | जिल्हास्तर | जिल्हा आरोग्य अधिकारी व जिल्हा शल्य चिकित्सक | राज्य नोडल अधिकारी | जिल्हा अहवाल प्रपत्र | १० ऑक्टोबर२०१६ |
| १० | राज्य | राज्य नोडल अधिकारी | बाल आरोग्य विभाग, MOHFW, Delhi | राज्य अहवाल प्रपत्र | १५ ऑक्टोबर २०१६ |

- महानगर पालिकांसाठी अहवाल सादर करण्याबाबतचे वेळापत्रक :-

| | **पातळी** | **अहवाल सादर करण्यास जबाबदार व्यक्ति** | **कोणास सादर करावयाचे** | **अहवाल नमुना** | **अहवाल सादरीकरणाची तारीख** |
|---|---|---|---|---|---|
| १ | शाळा | मुख्याध्यापक | हेल्थ पोस्ट च्या संबंधित आरोग्य सेविका/आरोग्य सेवक | शाळेचे अहवाल प्रपत्र | २० सप्टेंबर २०१६ |
| २ | अंगणवाडी केंद्र | अंगणवाडी कार्यकर्ती | हेल्थ पोस्ट च्या संबंधित आरोग्य सेविका/आरोग्य सेवक | अंगणवाडीचे अहवाल प्रपत्र | २० सप्टेंबर २०१६ |
| ३ | हेल्थ पोस्ट | वैद्यकिय अधिकारी | महानगरपालिका आरोग्य अधिकारी | प्रा.आ.केंद्र/ हेल्थ पोस्ट अहवाल प्रपत्र | २८ सप्टेंबर २०१६ |
| ४ | महानगरपालिका | महानगरपालिका आरोग्य अधिकारी | राज्य नोडल अधिकारी | जिल्हा अहवाल प्रपत्र | १० ऑक्टोबर २०१६ |

प्रपत्र १

# National Deworming Day (NDD)

Printing Guidelines for Prototypes

All the prototypes can be printed in color and black and white. To print the prototypes in the black and white, go to file > print>printer properties>color>**print in Grayscale**.

1. **Handouts - Teacher/ Anganwadi**
   Job type: Folder design, colour, front + back, CMYK (4 colour)
   Orientation: Refer to sample print Print
   process: Offset Printing Paper type- 100
   GSM
   Final print size: 24.81" x 11.69" (Custom size) – landscape orientation
   Post processes:
   - Creasing
   - Perforation

2. **Flipcharts - Teacher/Anganwadi**
   Job type: Flipchart, colour, front + back, CMYK (4 colour)
   Orientation: Refer to sample print
   Print process: Offset Printing
   Paper type- 170gsm - 220 GSM, uncoated
   Final print size: 16.54" x 23.39" (A2) – portrait
   Post processes:
   - Spiral binding
   - Cardboard on the back
   - Metal eye (rivet) for hanging it from a nail

3. **ASHA Leaflet**
   Job type: Colour, front + back, CMYK (4 colour) Print
   process: Offset Printing
   Paper type- 100 GSM uncoated
   Final print size: 8.27" x 11.69" (A4) – portrait
   Post processes:
   - None
4. **Posters (Health Care/ Date– Teacher/Anganwadi Worker)**
   Job type: Colour, one-sided, CMYK (4 colour) Print
   process: Offset Printing
   Paper type- 100-140 GSM, uncoated
   Final print size: 16.54" x 23.39" (A2) – portrait
   Post processes:
   - None
5. **Banner (Health Care – Teacher/Anganwadi Worker)**
   Job type: Colour, one-sided, CMYK (4 colour)
   Print process: Offset Printing
   Material – Flex -
   Final print size: 16.54" x 23.39" (A2) – landscape orientation
   Post processes:
   - None
6. **Banner (Health Care – Teacher/Anganwadi Worker)**
   Job type: Colour, one-sided, CMYK (4 colour) Print
   process: Offset Printing
   Material – Flex -
   Final print size: 16.54" x 23.39" (A2) – landscape orientation
   Post processes:
   - None
7. **Handbill (2 Variations)**
   Job type: Colour, front + back, CMYK (4 colour) Print
   process: Offset Printing

**********************************************************************************

# अहवाल नमूना : राष्ट्रीय जंतनाशक दिन

## शाळेचा अहवाल नमूना

"कृपया खालील सर्व रकाने भरावे."

| | | | |
|---|---|---|---|
| राज्य: | | जिल्हा : | |
| तालुका : | उपकेंद्र : | गावाचे नाव : | |
| शाळेचे नाव : | | शाळेचा डीआयएसई कोड | |
| शाळेचा प्रकार : शासकीय / अनुदानित शाळा ( ) | | खाजगी ( ) | |
| राष्ट्रीय जंतनाशक दिनाच्या प्रशिक्षणासाठी शाळेतून कोणी प्रतिनिधी उपस्थित होते का | | होय / नाही | |
| जंतनाशक मोहिमेसाठी प्रशिक्षित झालेल्या शिक्षकांची संख्या : | | | |

| अल्बेंडाझोल कवरेज | | | |
|---|---|---|---|
| | **मुली** | **मुले** | **एकूण** |
| शाळेच्या पटावर असलेल्या एकूण विद्यार्थ्यांची संख्या ( ६ ते १९ वर्षे) | | | (अ) |
| एकूण पटावर असलेल्या (वर्ग १ ते वर्ग ५) विद्यार्थ्यांपैकी राष्ट्रीय जंतनाशक दिनी अल्बेंडाझोल गोळी दिलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | | | (१) |
| एकूण पटावर असलेल्या (वर्ग १ ते वर्ग ५) विद्यार्थ्यांपैकी मॉप अप दिनी अल्बेंडाझोल गोळी दिलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | | | (२) |
| एकूण पटावर असलेल्या (वर्ग ६ ते वर्ग १२ ) विद्यार्थ्यांपैकी राष्ट्रीय जंतनाशक दिनी अल्बेंडाझोल गोळी दिलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | | | (३) |
| एकूण पटावर असलेल्या (वर्ग ६ ते वर्ग १२ ) विद्यार्थ्यांपैकी मॉप अप दिनी अल्बेंडाझोल गोळी दिलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | | | (४) |
| **इतर** | | | |
| **एकूण** : अल्बेंडाझोल गोळी दिलेल्या विद्यार्थ्यांची संख्या (ब = १+२+३+४ ) | (ब) | | |
| शाळेद्वारे नोंदविलेल्या एकूण प्रतिकुल घटना (प्रतिकुल घटना नोंदी विहित अहवालामध्ये सादर करावेत) | | | |

| **औषध साठ्याचे विवरण** | |
|---|---|
| शाळेला प्राप्त झालेल्या एकूण अल्बेंडाझोल गोळयांची संख्या | |
| शाळेत विद्यार्थ्यांना दिलेल्या **(जंतनाशक दिनी व मॉप अप दिनी)** एकूण अल्बेंडाझोल गोळयांची संख्या | |
| शाळेमध्ये शिल्लक राहिलेल्या एकूण अल्बेंडाझोल गोळयांची संख्या | |

**(मुख्याध्यपकांचे नाव)**

**मुख्याध्यपकांचे स्वाक्षरी**

**अहवाल सादर केल्याची दिनांक**

**मुख्याधापकांचा भ्रमण ध्वनी क्रमांक**

***मोहिमेदरम्यान अडचणी आल्यास मदतीसाठी समन्वय कक्षास संपर्क साधावा :***
***(नाव ........................................फोन नं ........................................)***

***आरोग्य सेविका/आरोग्य सेवकास अहवाल दि. २० फेब्रुवारी २०१६ पर्यंत सादर करावा.***

## राष्ट्रीय जंतनाशक दिन

## अंगणवाडी केंद्राचा अहवाल नमूना

" कृपया खालील सर्व रकाने भरावे."

| | | | |
|---|---|---|---|
| राज्य: | | जिल्हा: | |
| तालुका | **उपकेंद्र:** | गावाचे नाव : | |
| प्रकल्पाचे नाव | | अंगणवाडी केंद्र: | |
| अंगणवाडी कार्यकर्तीस जंतनाशक मोहिमेचे प्रशिक्षण दिले गेले आहे का (होय/नाही) ? | | | |

अल्बेंडाझोल कवरेज

| | **मुली** | **मुले** | **एकूण** |
|---|---|---|---|
| अंगणवाडी केंद्रामध्ये नोंदविलेल्या एकूण लाभार्थ्यांची संख्या | | | (अ) |
| अंगणवाडीत नोंदविलेल्या एकूण लाभार्थ्यांपैकी (वयोगट १ ते ५ वर्षे) राष्ट्रीय जंतनाशक दिनी अल्बेंडाझोल गोळी दिलेल्या लाभार्थ्यांची संख्या | | | (१) |
| अंगणवाडीत नोंदविलेल्या एकूण लाभार्थ्यांपैकी (वयोगट १ ते ५ वर्षे) मॉप अप दिनी अल्बेंडाझोल गोळी दिलेल्या लाभार्थ्यांची संख्या | | | (२) |
| अंगणवाडीत नोंदणी न झालेल्या एकूण लाभार्थ्यांपैकी (वयोगट १ ते ५ वर्षे) राष्ट्रीय जंतनाशक दिनी अल्बेंडाझोल गोळी दिलेल्या लाभार्थ्यांची संख्या | | | (३) |
| अंगणवाडीत नोंदणी न झालेल्या एकूण लाभार्थ्यांपैकी (वयोगट १ ते ५ वर्षे) मॉप अप दिनी अल्बेंडाझोल गोळी दिलेल्या लाभार्थ्यांची संख्या | | | (४) |
| **शाळेत न जाणाऱ्या (६ ते १० वर्षे)** वयोगटातील लाभार्थ्यांना राष्ट्रीय जंतनाशक दिनी अल्बेंडाझोल गोळी दिलेल्या लाभार्थ्यांची संख्या | | | (५) |
| **शाळेत न जाणाऱ्या (६ ते १० वर्षे)** वयोगटातील लाभार्थ्यांना मॉप अप दिनी अल्बेंडाझोल गोळी दिलेल्या लाभार्थ्यांची संख्या | | | (६) |
| **शाळेत न जाणाऱ्या (१० ते १९ वर्षे)** वयोगटातील लाभार्थ्यांना राष्ट्रीय जंतनाशक दिनी अल्बेंडाझोल गोळी दिलेल्या लाभार्थ्यांची संख्या | | | (७) |
| **शाळेत न जाणाऱ्या (१० ते १९ वर्षे)** वयोगटातील लाभार्थ्यांना मॉप अप दिनी अल्बेंडाझोल गोळी दिलेल्या लाभार्थ्यांची संख्या | | | (८) |
| **एकूण :** अल्बेंडाझोल गोळी दिलेल्या लाभार्थ्यांची संख्या (ब = १+२+३+४+५+६ +७+८) | **(ब)** | | |
| अंगणवाडीद्वारे नोंदविलेल्या एकूण प्रतिकुल घटना (प्रतिकुल घटना नोंदी विहित अहवालामध्ये सादर करावेत) | | | |

**औषध साठ्याचे विवरण**

| | |
|---|---|
| अंगणवाडी केंद्राला प्राप्त झालेल्या एकूण अल्बेंडाझोल गोळयांची संख्या | |
| अंगणवाडीत लाभार्थ्यांना दिलेल्या एकूण अल्बेंडाझोल गोळयांची संख्या **(जंतनाशक दिनी व मॉप अप दिनी)** | |
| अंगणवाडीमध्ये शिल्लक राहिलेल्या एकूण अल्बेंडाझोल गोळयांची संख्या | |

| | |
|---|---|
| **अंगणवाडी कार्यकर्तीचे नाव** | **अंगणवाडी कार्यकर्तीची स्वाक्षरी** |
| **अंगणवाडी कार्यकर्तीचा भ्रमणध्वनी क्रमांक** | **अहवाल सादर केल्याचा दिनांक** |

***मोहिमेदरम्यान अडचणी आल्यास मदतीसाठी समन्वय कक्षास संपर्क साधावा :***
*(नाव ..........................................फोन नं ...........................................)*

***आरोग्य सेविका/आरोग्य सेवकास अहवाल दि. २० फेब्रुवारी २०१६ पर्यंत सादर करावा.***

**राष्ट्रीय जंतनाशक दिन**

**आशा - मानक अहवाल नमूना**

" कृपया खालील सर्व रकाने भरावे"

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| राज्य : | | जिल्हा | तालुका | | |
| प्राथमिक आरोग्य केंद्र | | उपकेंद्र: | गावाचे नाव : | | |
| | | | अंगणवाडी केंद्र | | |
| आरोग्य सेविका/आरोग्य सेवकाचे नाव : | | | | | |
| पटावर नसलेल्या लाभार्थ्यांची माहिती | | | | | |
| क्रमांक | लाभार्थ्यांचे नाव | वडिलांचे नाव | आईचे नाव | वय (वर्षात) | जंतनाशक औषधी दिले (होय/नाही) |
| १ | | | | | |
| २ | | | | | |
| ३ | | | | | |
| ४ | | | | | |
| ५ | | | | | |
| ६ | | | | | |
| ७ | | | | | |
| ८ | | | | | |
| ९ | | | | | |
| १० | | | | | |
| ११ | | | | | |
| १२ | | | | | |
| १३ | | | | | |
| १४ | | | | | |
| १५ | | | | | |
| १६ | | | | | |
| १७ | | | | | |
| १८ | | | | | |
| १९ | | | | | |
| २० | | | | | |

(आशा कार्यकर्तीचे नाव व स्वाक्षरी)

(अंगणवाडी कार्यकर्तीचे नाव व स्वाक्षरी)

*मोहिमेदरम्यान अडचणी आल्यास मदतीसाठी समन्वय कक्षास संपर्क साधावा :*
*(नाव ........................................फोन नं ......................................)*

*आरोग्य सेविका/आरोग्य सेवकास अहवाल दि. २० फेब्रुवारी २०१६ पर्यंत सादर करावा.*

# राष्ट्रीय जंतनाशक दिन अहवाल

## (उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र, तालुका, जिल्हा,राज्यासाठी)

"कृपया खालील सर्व रकाने भरावे आणि माहिती उपलब्ध नसल्यास अप्राप्त असे नमूद करावे"

| | | | |
|---|---|---|---|
| राज्यः | जिल्हा : | तालुका : | |
| प्राथमिक आरोग्य केंद्र : | | उपकेंद्र : | |
| तालुका /जिल्हा/राज्यामधील एकुण शासकीय व शासकीय अनुदानित शाळांची संख्या | | तालुका /जिल्हा/राज्यामध्ये जंतनाशक मोहिमेचा अहवाल सादर केलेल्या एकुण शासकीय व शासकीय अनुदानित शाळांची संख्या | |
| तालुका /जिल्हा/राज्यामधील एकुण खाजगी अनुदानित शाळांची संख्या | | तालुका /जिल्हा/राज्यामध्ये जंतनाशक मोहिमेचा अहवाल सादर केलेल्या एकुण खाजगी अनुदानित शाळांची संख्या | |
| तालुका /जिल्हा/राज्यामधील अंगणवाडीची संख्या | | तालुका /जिल्हा/राज्यामध्ये जंतनाशक मोहिमेचा अहवाल सादर केलेल्या अंगणवाड्यांची संख्या | |

| | |
|---|---|
| जंतनाशक मोहिमेचे प्रशिक्षण घेतलेल्या आशांची संख्या | |
| जंतनाशक मोहिमेचे प्रशिक्षण घेतलेले शासकीय व शासकीय अनुदानीत शाळातील शिक्षक/प्राचार्य यांची संख्या | |
| जंतनाशक मोहिमेचे प्रशिक्षण घेतलेले खाजगी अनुदानीत शाळातील शिक्षक/प्राचार्य यांची संख्या | |
| जंतनाशक मोहिमेचे प्रशिक्षण घेतलेल्या अंगणवाडी कार्यकर्ती यांची संख्या | |

अल्बेंडाझोल कवरेज

| | | मुली | मुले | एकूण |
|---|---|---|---|---|
| शालाबाह्य मुलांची एकुण संख्या | | | | अ |
| अंगणवाडी केंद्रामध्ये नोंदी न झालेल्या एकूण लाभार्थ्यांची संख्या | | | | ब |
| अंगणवाडी केंद्रामध्ये नोंदी झालेल्या एकूण लाभार्थ्यांची संख्या | | | | क |
| शाळेत दाखल असलेल्या लाभार्थ्यांची संख्या | शासकीय व शासकीय अनुदानीत शाळा | | | ड |
| | खाजगी अनुदानीत शाळा | | | इ |
| एकूण अपेक्षित लाभार्थ्यांची संख्या (Z) = ( अ+ ब + क+ ड + इ ) | | | | (Z) |
| शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी (१ ली ते ५ वी वर्गातील ) राष्ट्रीय जंतनाशक दिनी व मॉप अप दिनी जंतनाशक गोळया दिलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | शासकीय व शासकीय अनुदानीत शाळा | | | (१ A) |
| | खाजगी अनुदानीत शाळा | | | (१ B) |
| शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी (६ वी ते १२ वी वर्गातील ) राष्ट्रीय जंतनाशक दिनी व मॉप अप दिनी जंतनाशक गोळया दिलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | शासकीय व शासकीय अनुदानीत शाळा | | | (२ A) |
| | खाजगी अनुदानीत शाळा | | | (२ B) |
| अंगणवाडी केंद्रामध्ये नोंदी झालेल्या ( १ ते ५ वर्षे ) वयोगटातील राष्ट्रीय जंतनाशक दिनी व मॉप अप दिनी जंतनाशक गोळया दिलेल्या लाभार्थी संख्या | | | | ३ |
| अंगणवाडी केंद्रामध्ये नोंदी न झालेल्या ( १ ते ५ वर्षे ) वयोगटातील राष्ट्रीय जंतनाशक दिनी व मॉप अप दिनी जंतनाशक गोळया दिलेल्या लाभार्थी संख्या | | | | ४ |
| एकूण शाळाबाह्य लाभार्थ्यांपैकी राष्ट्रीय जंतनाशक दिनी व मॉप अप दिनी जंतनाशक गोळया दिलेल्या ६ ते १० वर्षे वयोगटातील लाभार्थ्यांची संख्या | | | | ५ |
| एकूण शाळाबाह्य लाभार्थ्यांपैकी राष्ट्रीय जंतनाशक दिनी व मॉप अप दिनी जंतनाशक गोळया दिलेल्या १० ते १९ वर्षे वयोगटातील लाभार्थ्यांची संख्या | | | | ६ |
| राष्ट्रीय जंतनाशक दिनी व मॉप अप दिनी जंतनाशक गोळया दिलेल्या लाभार्थ्यांची संख्या (T ) (T = १A+१B+ २A+२B +३+४+५+६) | | | | (T) |
| कार्याची टक्केवारी | | (T) × १००/ (Z) = | | |
| शाळा व अंगणवाडी केंद्राद्वारे कळविलेल्या तीव्र प्रतिकुल घटनांच्या संख्या (विहीत नमून्यामध्ये) | | | | |

**औषध साठयाचे विवरण**

| उपकेंद्र/ प्रा.आ.केंद्र /तालुका/जिल्हा/राज्य *(कृपया अहवाल लागू होणाऱ्या स्तराप्रमाणे टिकमार्क करा)* | शासकीय व शासकीय अनुदानीत शाळा | खाजगी अनुदानीत शाळा | अंगणवाडी केंद्र |
|---|---|---|---|
| एकूण अल्बेंडाझोल गोळया दिल्याची संख्या | | | |
| एकूण वापरलेल्या अल्बेंडाझोल गोळयांची संख्या (राष्ट्रीय जंतनाशक दिनी आणि मॉप अप दिनी यांची बेरीज) | | | |
| अल्बेंडाझोल गोळयांचा शिल्लक साठा | | | |
| उपकेंद्र/ प्रा.आ.केंद्र /तालुका/जिल्हा/राज्य यांच्याकडून पाठपुरावा (असल्यास) | | | |

(स्वाक्षरार्थीचे नाव व स्वाक्षरी)

(आरोग्य सेविका/आरोग्य सेवक / वैद्यकिय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र / तालुका / जिल्हास्तर अधिकारी / राज्यस्तर अधिकारी)

*मोहिमेदरम्यान अडचणी आल्यास मदतीसाठी समन्वय कक्षास संपर्क साधावा :*

*(नाव ..........................................फोन नं ......................................)*

## विभाग - ४

**सौम्य प्रतिकुल घटना झालेल्याचा अहवाल**
**(शाळा/अंगणवाडी केंद्र पातळीवर हाताळता येऊ शकलेली घटना)**
**शाळेच्या मुख्यध्यापक/ अंगणवाडी सेविका/ आरोग्य सेविका यांनी भरावयाचा अहवाल**

| | | | |
|---|---|---|---|
| मुलाचे नाव आणि पत्ता - | | | |
| शाळेचा पत्ता - | | पालकांना संपर्क करण्यासाठीची माहिती - | |
| उपचाराचे ठिकाण - | | | |
| अहवाल सादर करणाऱ्याचे नाव - | | | |
| अहवाल सादर करणाऱ्या व्यक्तीला संपर्क करण्यासाठीची माहिती - | | | |
| औषधाचे मुळ नाव ( बाजार नाव नाही ) | मात्रा | कंपनी नाव आणि निर्माता | गटाचा क्रमांक (बॅच नंबर) |
| | | | |
| जंतनाशक गोळी दिल्याची तारीख व वेळ - | | प्रतिकुल परिणाम सुरु झाल्याचा दिनांक व वेळ - | |
| प्रतिकुल परिणामाचा उपचार करण्यासाठी केलेल्या कृती - | | | |
| पुर्वीचा वैद्यकीय इतिहास असल्यास - | | | |
| जवळचे हॉस्पिटल / आरोग्य केंद्र जेथे बरे वाटत नसलेल्या मुलास / मुलीस दाखल करण्यात आले - | | | |

प्रपत्र ५

राष्ट्रीय जंतनाशक दिन बारंवार विचारले जाणारे प्रश्न आणि त्याचा शास्त्रोक्त आधार

| अ.क्र. | प्रश्न | उत्तरे |
|---|---|---|
| १. | लोकांना आतडयांतील जंताचा प्रादुर्भाव कसा होतो आणि सर्वात जास्त सामान्य जंत कोणते आहेत ? | मातीतून होणारे जंतसंसर्ग ( Soil Transmitted Helminthes ) हे मातीमध्ये मिसळलेल्या मानवी विष्टेतील अंडयातून होतो. हे सर्व साधारण जेथे अस्वच्छता असते किंवा कमी स्वच्छतेच्या ठिकाणाहून प्रसारित होतात.<br><br>या रोगाचा प्रसार कसा होऊ शकतो<br><br>१. ही अंडी मातीने भरलेल्या भाज्यांवर जडलेली असतात. अशा भाज्या स्वच्छ पाण्यात न धुतल्याने, किंवा भाजीवरची साल न काढल्याने, किंवा भाजी व्यवस्थित न शिजवल्याने .<br><br>२. दूषित पाण्याचे सेवन केल्याने<br><br>३. दुषित मातीत खेळल्याने . मुलांमध्ये मोठयाप्रमाणात प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते.<br><br>राउंड वर्म (ऍसकॅरिस लमब्रीकॉईड्स ), व्हीप वर्म, (ट्रीचुरीस ट्रीचुरा) आणि हुक वर्म (नीकॅटर अमेरीकॅनस व ॲनकायलोस्टोमा डयूओडिनॅले) हे जंताचे मूळ प्रकार आहेत. |
| २. | भारतात सॉईल ट्रान्समीट हेलमींथ ( एस.टी.एच )चे प्रमाण किती आहे? | जागतिक आरोग्य संस्था यांच्यानुसार एस.टी.एच ही भारताच्या सार्वजनिक आरोग्य विभागासाठी काळजीची बाब आहे व १ ते १४ वर्ष वयोगटातील अंदाजे २४१ दशलक्ष मुले ही एस. टी. एच लागवणीसाठी जोखमीची आहेत. हे प्रमाण या वयोगटातील एकूण मुलांच्या ६८% आहे. तर मुलांच्या जागतिक लोकसंख्यपैकी २८% मुलांना या जंत प्रादुर्भावाचा धोका आहे. राज्य भर एकुण जंत प्रादुर्भावाची समस्या सध्या उपलब्ध नाही. परंतु आता केंद्र शासनाच्या निर्देशानुसार सर्व राज्यांमध्ये मातीतून प्रसारित होणाऱ्या जंतसंसर्गाचे सर्वेक्षण सूरु आहे. |
| ३. | सॉईल ट्रान्समीट हेलमींट ( एस.टी.एच )च्या प्रमाणाचे सर्वेक्षण कसे केले जाते ? | कार्यक्षेत्रातील शाळेच्या मुलांचे शौचाचे नमुने घेऊन त्याचे प्रयोगशाळेमध्ये विश्लेपण केले जाते. यावरुन रोगाचा प्रमाण आणि तीव्रता समजली जाते. या नमून्यांवरून राज्यातील एस.टी.एच याचे प्रमाण आणि जोखीम यांचे मूल्य मापन केले जाते. प्रयोशाळातील विश्लेपण हे आयोजित तांत्रिक संस्था मध्ये कौशल्यपूर्वक हाताळली जाते आणि विश्लेपण करुन ही माहिती तयार करण्यात येते. |

| | | |
|---|---|---|
| ४. | आपण जंताचा प्रादुर्भाव कसा रोखू शकतो ? | जंताचा प्रादुर्भाव कमी करण्याचे अनेक मार्ग आहे जसे की,<br>● हात धुणे, विशेषतः जेवणाआधी आणि शौचास जाऊन आल्यानंतर<br>● शौचालयाचा वापर करणे व शौचालयाची स्वच्छता राखणे<br>● चपला / बुट वापरणे<br>● सुरक्षित आणि स्वच्छ पाणी पिणे<br>● अन्न झाकूण ठेवणे<br>● नखे नेहमी स्वछ ठेवणे व नियमित कापणे<br>● भाज्या, फळे आणि सॅलड सुरक्षित आणि स्वच्छ पाण्यात धुणे |
| ५. | एस. टी. एच. चा बालकांच्या आहारावर व पोषणावर काय परिणाम होतो ? | जंताच्या प्रादुर्भावामुळे लोकांच्या आरोग्यावर दुष्परिणाम होतो कमजोर पोषणावर विविध मार्गांनी जंताचा प्रभाव होतो.<br>● जंताचा व्यक्तिच्या पेशींवर प्रादुर्भाव होतो ज्यामुळे लोह आणि प्रथिनांचा तोटा होतो आणि त्यामुळे रक्तक्षय होतो.<br>● जंतामुळे लहान आतडयांमधून पोषक घटक यांचे शोषण होत नाही. तसेच राऊंड वर्म हे आतडयांमधून जीवनसत्व अ शोषून घेण्यास स्पर्धा करतात.<br>● काही जंतांच्या प्रादूर्भावामुळे भूक नष्ट होते. व त्यामुळे आहार घेण्यात कमतरता निर्माण होते व त्यामुळे शरिर कमकुवत होते.<br>● काही जंतामुळे अतिसार होऊ शकतो. |
| ६. | जंताच्या प्रादुर्भावामुळे मुलांच्या विकासावर आणि शिक्षणावर कसा परिणाम होतो ? | जंताचा मुलांच्या मानसिक आणि शारिरीक विकासावर नकारात्मक परिणाम होतो. जंतसंसर्ग झालेल्या मुलं हे बहुदा कुपोषित असतात व त्यांची वाढ खुंटते. जंतसंसर्ग जर तीव्र स्वरुपाचा व दीर्घकाळ असेल तर मुले सारखे आजारी पडतात व शिक्षणात त्यांचे लक्ष लागत नाही आणि शाळेतून नेहमी गैरहजर असतात. यामुळे मोठे झाल्यावर अशा मुलांची आवक सुध्दा कमी असते. |
| ७. | जंतप्रादुर्भावाचा बालमृत्यूवर काय परिणाम होतो ? | आतडयातील जंतसंसर्ग बाल मृत्युपेक्षा त्यांच्या आरोग्यावर अधिक परिणाम करते. सद्यः स्थितीत जंतसंसर्गामुळे होणाऱ्या बाल मृत्यूंसाठी कुठलेही पुरावे उपलब्ध नाहीत. तरी मूलतः जंतांचा मुलांच्या जीवन जगण्याच्या गुणवत्तेमध्ये आणि नकारात्मक आरोग्य , शिक्षण आणि उपजिविकेवर परिणाम करणारे पुरावा आहे. |
| ८. | जंतनाशक गोळया आणि लोहयुक्त | जागतिक आरोग्य संघटने प्रमाणे नियतकालिक जंतनाशन हे |

| | | |
|---|---|---|
| | गोळया एकत्रित देवू शकतो का ? | सहज रित्या बाल आरोग्य दिन, पुर्व शालेय बालकांना दिल्या जाणाऱ्या जीवनसत्व अ मोहिमेमध्ये किंवा शालेय आरोग्य कार्यक्रमात सहजरित्या एकत्रित करता येते. याशिवाय National Iron + initiative व विकली आयर्न फॉलिक ॲसिड सप्लिमेंटेशन योजनेचा एक भाग म्हणून नियतकालिक जंतनाशकाची शिफारस केंद्रशासनाच्या मार्गदर्शक सुचनांमध्ये केली आहे. |
| ९. | देशातून आपण मातीतून प्रसारित होणारा जंतसंसर्गास आळा घालू शकू का ? | सुधारित स्वच्छता अटींमूळे बहुतांश देशातून मातीतून प्रसारित होणारा जंतसंसर्गास आळा घालण्यात आला आहे. त्यात अमेरिका व दक्षिण कोरीया सारख्या देशांचा समावेश आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या सल्ल्याप्रमाणे या प्रश्नाला आळा घालण्यासाठी मोठया जन संख्येचे जंतसंक्रमण कमी करण्यास उपचार करणे गरजेचे आहे. |
| १०. | जंतनाशकासाठी जागतिक आरोग्य संघटनेचे काय मार्गदर्शन आहे ? | मातीतून प्रसारित होणाऱ्या जंतसंसर्गासाठी आळा घालण्यासाठी जागतिक आरोग्य संघटनेने खालील प्रमाणे मार्गदर्शन केलेले आहे.<br>• जंतसंसर्गाचा प्रादर्भाव असलेल्या भागामध्ये राहणाऱ्या लोकांसाठी नियमित जंतनाशक औषधी देणे गरजेचे आहे.<br>• यात पुर्वशालेय बालके, शाळेत जाणारे मुले - मुली व कुमारवयीन मुले - मुली तसेच गर्भधारणेस पात्र स्त्रिया (यात दुसऱ्या व तिमाहीतील गर्भवती स्त्री तसेच स्तनदा माता ) यांचा समावेश असावा.<br>• जोखमीच्या भागात राहणाऱ्या व्यक्तिंना जंतनाशक औषधी देण्यासाठी जंतसंसर्ग आहे किंवा नाही या अहवालाची गरज नाही. |
| ११. | लहान मुलांसाठी जंतनाशक औषधीची मात्रा किती आहे ? | केंद्र शासनाच्या मार्गदर्शनाप्रमाणे जंतनाशनासाठी अल्बेंडाझोल नावाची गोळी वापरली जाते. ही गोळी संपुर्ण जगात आतडयातील जंतसंसर्ग कमी करण्यास वापरली जाते. १ ते २ वर्षे वयोगटातील लाभार्थ्यांसाठी अल्बेंडाझोल गोळीची अर्धी गोळी ( २०० मीलीग्रॅम ) तर २ ते १९ वर्षे वयोगटातील लाभार्थ्यांसाठी अल्बेंडाझोल ( ४०० मीलीग्रॅम ) ची एक गोळी द्यावी.<br>लहान मुलांसाठी गोळीची चूर्ण करुन व पाण्यात विरघळवून ही गोळी द्यावी. तसेच प्रत्येक औषध हे आरोग्य कर्मचारीच्या देखरेखीखाली देण्यात यावे. |
| १२. | जंतनाशक औषधीचा काही दुष्परिणाम आहे का ? | जंतनाशक औषधीमुळे होणारे दुष्परिणाम फारच थोडे आहेत त्यात सौम्य प्रमाणात चक्कर येणे, मळमळणे, उलटी होणे किंवा डोके दुखी यांचा समावेश आहे हे सर्व लाभार्थीच्या शरीरात जंतसंसर्गामुळे व त्यावर होणाऱ्या औषधाच्या |

| | | |
|---|---|---|
| | | परिणामामुळे होतो. हे सर्व दुष्परिणाम थोडयाच वेळात नाहीशे होतात.<br><br>ज्या मुलांमध्ये तीव्र जंतसंसर्ग असतो त्यांना या प्रकाराच्या सौम्य दुष्परिणाभाचा अनुभव येतो. औषधी दिल्यावर २४ तासाच्या आत दुष्परिणाम कमी न झाल्यास किंवा दुष्परिणाम तीव्र स्वरुपाचे असल्यास ताबडतोब नजीकच्या आरोग्य केंद्रास लाभार्थ्याला घेऊन जावे. |

प्रपत्र ६

राष्ट्रीय जंतनाशक दिन वारंवार विचारले जाणारे प्रश्न आणि त्याचा शास्त्रोक्त आधार

आरोग्य कर्मचारी, अंगणवाडी सेविका व शिक्षकांसाठी

| अ.क्र. | प्रश्न | उत्तरे |
|---|---|---|
| १. | आतडयांचा जंत दोष म्हणजे काय ? | जंत हे परजीवी असतात ते मनुष्याच्या आतडयांमध्ये राहून त्यांच्या अन्नावर जगतात . आपल्या शरिरासाठी असलेले पोषक तत्व हे जंत शोषून घेतात व यामूळे रक्तक्षय, कुपोषण व वाढ खुंटते. |
| २. | जंतांचा प्रादुर्भाव कसा होतो ? | अपुरी परिसर स्वच्छता व अपुऱ्या वैयक्तिक स्वच्छतेच्या सवयींमुळे जंतसंसर्ग होतो. हा जंतसंसर्ग पुष्कळदा संसर्गीत मातीतून होतो. सोबत दिलेले चित्र पहा. |
| ३. | जंतांचा प्रादुर्भावापासून बचाव करावयाचे उपाय काय ? | जंतांच्या प्रादुर्भावापासून स्वतःचा बचाव करण्यासाठीच उपाय खालील प्रमाणे आहे.<br>● हात धुणे, विशेषतः जेवणाआधी आणि शौचास जाऊन आल्यानंतर<br>● शौचाल्याचा वापर करणे व शौचालयाची स्वच्छता राखणे<br>● चपला / बुट वापरणे<br>● सुरक्षित आणि स्वच्छ पाणी पिणे<br>● अन्न झाकूण ठेवणे<br>● नखे नेहमी स्वछ ठेवणे व नियमित कापणे<br>● भाज्या, फळे आणि सॅलड सुरक्षित आणि स्वच्छ पाण्यात धुणे |
| ४. | जंतांच्या प्रादुर्भावामुळे काय हानी होते ? मुलांना नियमित जंतनाशक औषधी देणे का महत्वाचे आहे ? | जंताचा मुलांच्या मानसिक आणि शारिरीक विकासावर नकारात्मक परिणाम होतो. जंतसंसर्ग झालेल्या मुलं हे बहुदा कुपोषित असतात व त्यांची वाढ खुंटते. जंतसंसर्ग जर तीव्र स्वरुपाचा व दीर्घकाळ असेल तर मुले सारखे आजारी पडतात व शिक्षणात त्यांचे लक्ष लागत नाही आणि शाळेतून नेहमी गैरहजर असतात. ज्या मुलांना नियमित जंतनाशकाचे औषध दिले जाते ती मुले :-<br>● जलद गतीने वाढतात व सुदृढ असतात.<br>● त्यांना वारंवार जंतू संसर्ग होत नाही व ते वारंवार आजारी पडत नाहीत.<br>● शाळेत नियमित जातात.<br>● शाळेत सक्रिय असतात व चांगले शिकतात. |
| ५. | राष्ट्रीय जंतनाशक दिन म्हणजे काय ? | राष्ट्रीय जंतनाशक दिनी सर्व १ ते १९ वर्ष वयोगटातील मुला - मुलींना एकाच वेळी जंतनाशक औषधी दिली जाईल. हे औषध सर्व शासकीय, शासकीय अनुदानित व |

| | | |
|---|---|---|
| | | खाजगी अनुदानित शाळांतून तसेच अंगणवाडी केंद्रातुन दिले जाईल . |
| ६. | इतर राष्ट्रीय कार्यक्रमांमध्ये जंतनाशक औषधी दिली असता राष्ट्रीय जंतनाशक दिन साजरा करण्याचे काय महत्व आहे ? | इतर राष्ट्रीय कार्यक्रमांमधून (NIPI, WIFS ) जंतनाशक औषधी दिले जाते परंतु यामध्ये सर्व जोखीम असणाऱ्या लाभार्थ्यांपर्यंत आपण पोहचू शकलो नाही. राष्ट्रीय जंतनाशक दिन हा एक दिवसीय कार्यक्रम संपुर्ण भारत भर एकाच दिवशी राबविण्यात येणार आहे जेणे करुन जास्तीत जास्त मुलांपर्यंत जंतनाशक औषधी पोहचू शकेल. |
| ७. | राष्ट्रीय जंतनाशक दिन कधी साजरा करावयाचा आहे ? | २ सप्टेंबर २०१६ ला संपूर्ण राज्यात राष्ट्रीय जंतनाशक दिन साजरा करण्यात येणार आहे तसेच ज्या लाभार्थ्यांना ०२ सप्टेंबर २०१६ ला जंतनाशक गोळी दिली नसेल त्यांना ०७ सप्टेंबर २०१६ ला मॉप अप दिनी जंतनाशक औषधी द्यावयाची आहे. |
| ८. | या गोळया शिक्षक व अंगणवाडी कार्यकर्ती मार्फत यांच्यामध्ये तसेच आरोग्य कर्मचाऱ्यांमार्फत का वितरीत केले जात आहे ? | मुले शिक्षक आणि अंगणवाडी कार्यकर्ती यांच्याबरोबर अधिक चांगल्या प्रकारे एकरुप होतात आणि समाज तसेच पालकांना त्यांच्याविषयी अधिक आत्मविश्वास आहे. मुलभूत प्रशिक्षणानंतर शिक्षक आणि अंगणवाडी कार्यकर्ती मुला - मुलींना सहजरित्या जंतनाशकाची औषधी देऊ शकतात. काही राज्यात शिक्षक आणि अंगणवाडी कार्यकर्ती यांनी जंतनाशक मोहिमे अंतर्गत मुला - मुलींना यशस्वीरित्या जंतनाशक औषधी दिलेली आहे. आणि जगभरातील ३० देशात सुध्दा याची प्रभावी अंमलबजावणी झालेली आहे. |
| ९. | काही मुले आजारी दिसत नसले तरी सर्वांना एक सारखे जंतनाशक गोळया का दिल्या जातात ? | जंतबाधेचा दुष्परिणाम लगेच दिसू शकत नसला तरी, दीर्घावधी नंतर मुला - मुलींना इजा होऊ शकते. जसे आरोग्य, शिक्षण आणि इतर सर्व बाबींवर याचा दुष्परिणाम होऊ शकतो. मुलांमध्ये जंत बाधा झाली तरी ते बरेच काळ लक्षात येत नाही जोपर्यंत मुले आजारी पडत नाहीत किंवा शाळेत त्यांची प्रगती असमाधानकारक असते किंवा त्यांची वाढ व्यवस्थित नसते.<br>जंतबाधाचे निदान करणे महाग आहे व जंतनाशकाची गोळी सुरक्षित असल्यामुळे सर्व मुलांचे जंतनाशन करणे योग्य आहे. |
| १०. | आतडयांसंबंधी जंतापासून बचावासाठी कोणते उपचार करणे गरजे आहे. | केंद्र शासनाच्या मार्गदर्शनाप्रमाणे जंतनाशनासाठी अल्बेंडाझोल नावाची गोळी वापरली जाते. ही गोळी संपुर्ण जगात आतडयातील जंतसंसर्ग कमी करण्यास वापरली जाते. १ ते २ वर्षे वयोगटातील लाभार्थ्यांसाठी अल्बेंडाझोल गोळीची अर्धी गोळी ( २०० मीलीग्रॅम ) तर २ ते १९ वर्षे वयोगटातील लाभार्थ्यांसाठी अल्बेंडाझोल (४०० मीलीग्रॅम ) ची एक गोळी द्यावी.<br>लहान मुलांसाठी गोळीची चूर्ण करुन व पाण्यात विरघळवून ही गोळी द्यावी. तसेच प्रत्येक औषध हे आरोग्य कर्मचारीच्या देखरेखीखाली देण्यात यावे. |

| | | |
|---|---|---|
| ११. | जंतनाशक औषधीचा काही दुष्परिणाम आहे का ? | जंतनाशक औषधीमुळे होणारे दुष्परिणाम फारच थोडे आहेत त्यात सौम्य प्रमाणात चक्कर येणे, मळमळणे, उलटी होणे किंवा डोके दुखी यांचा समावेश आहे हे सर्व लाभार्थीच्या शरीरात जंतसंसर्गामुळे व त्यावर होणाऱ्या औषधाच्या परिणामामुळे होतो. हे सर्व दुष्परिणाम थोडयाच वेळात नाहीशे होतात.<br><br>ज्या मुलांमध्ये तीव्र जंतसंसर्ग असतो त्यांना या प्रकाराच्या सौम्य दुष्परिणामाचा अनुभव येतो. औषधी दिल्यावर २४ तासाच्या आत दुष्परिणाम कमी न झाल्यास किंवा दुष्परिणाम तीव्र स्वरुपाचे असल्यास ताबडतोब नजीकच्या आरोग्य केंद्रास लाभार्थ्याला घेऊन जावे. |
| १२. | जेवण न करताही मुलांनी जंतनाशकाची गोळी घेणे सुरक्षित आहे का ? | जंतनाशक गोळी उपर्शी पोटी घेतल्यास काही हरकत नाही. |
| १३. | आजारी मुला - मुलींना जंतनाशकाची गोळी देऊ शकतो का ? | जर मुले - मुली आजारी असतील तर त्यांना जंतनाशकाची गोळी देऊ नये. लाभार्थ्यांची प्रकृती सामान्य असल्यासच जंतनाशकाची गोळी दया. |
| १४. | जंतनाशक गोळी घेतल्यानंतर मुला - मुलींना नकारात्मक प्रतिक्रिया किंवा त्याच्यावर प्रतिकूल परिणाम झाल्यास शिक्षकांनी / अंगणवाडी कार्यकर्तीनी काय करावे ? | असे काही झाल्यास ताबडतोब हेल्प लाईन नंबर १०४ यांना संपर्क करावा. लाभार्थ्याला सावलीत विश्रांती करण्यास घेऊन जावे व स्वच्छ पाणी पिण्यास द्यावे. जर प्रतिक्रीया गंभीर स्वरुपाची असेल तर हे जंतनाशक औषधीशी निगडीत नसून इतर काही कारणांमुळे सुध्दा असू शकते. अशा वेळी ताबडतोब नजीकच्या आरोग्य संस्थेला लाभार्थ्याला घेऊन जावे. आवश्यकतेनुसार १०८ चा वापर संदर्भ सेवेसाठी करावा. |

**अतिरिक्त संचालक आरोग्य सेवा ,**

**कुटुंब कल्याण , माताबाल संगोपन व शालेय आरोग्य , पुणे**